# मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र.मनपा/आयुक्त/७२६/२०२१-२२
आयुक्त यांचे कार्यालय
दि. २८/०६/२०२१

वाचा :- जा.क्र.मनपा/आस्था/६८८/२०२१-२२, दि.२२/०६/२०२१ रोजीचा आदेश.

**कार्यालयीन आदेश**

या आदेशाद्वारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९, ६८, ६९, ८४ (१) नुसार रक्कम रु.१०.०० लक्ष पर्यंतची ठेकेदार/पुरवठादार यांची प्रदानासाठीची देयके मंजूर करणे व धनादेशावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार उपायुक्त (मु.) यांना प्रदान करण्यात येत आहे.

तसेच रु.१०.०० लक्षावरील ते रु.२५.०० लक्ष रक्कमेपर्यंतची ठेकेदार/पुरवठादार यांच्या प्रदानासाठीची देयके मंजूर करणे व धनादेशावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार अतिरीक्त आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहे.

तसेच रु.२५.०० लक्ष रक्कमेवरील ठेकेदार/पुरवठादार यांची प्रदानासाठीची देयके मंजुरीचे अधिकार आयुक्तांकडे अबाधीत राहतील. तथापि मंजुर केलेल्या धनादेशावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार अतिरिक्त आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहे.

ठेकेदार/पुरवठादार यांची प्रदानासाठीची देयके विभागप्रमुख यांनी तपासुन प्रमाणित करुन मुख्यलेखाधिकारी व मुख्यलेखापरीक्षक यांच्या तपासणीअंती स्वयंस्पष्ट अभिप्रायासह वर नमुद संबंधित सक्षम अधिकारी यांचेकडे मंजुरीस सादर करावे.

तरी यापुढे मंजुर देयकांचे प्रदानार्थ रक्कम रु. १०.०० लक्ष पर्यंतचे धनादेशावर मुख्यलेखाधिकारी व उपायुक्त (मु.) तसेच रक्कम रु.१०.०० लक्षवरील धनादेशावर मुख्यलेखाधिकारी व अतिरिक्त आयुक्त यांची संयुक्त स्वाक्षरी विधी ग्राहय राहिल.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :-
१) अतिरिक्त आयुक्त
२) उपायुक्त (सर्व)
३) शहर अभियंता
४) खाते प्रमुख / विभाग प्रमुख (सर्व)
५) मुख्य लेखा अधिकारी
६) मुख्य लेखा परीक्षक
७) आदेश नस्ती

यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी.

प्रत :- माहितीस्तव,
१) मा.महापौर
२) मा.उप-महापौर
३) मा.सभापती, स्थायी समिती
४) मा.सभागृह नेता
५) मा.विरोधी पक्ष नेता
६) मा.सभापती, परिवहन समिती